


# ‘बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र’ पर्यटकांसाठी खुले



**विक्रांत पाटील**
(मो.नं.८६६९९३२९८२ )
सेल्स ऑफिसर- एक्स्पोर्टस्
ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि., नाशिक

**ना**शिक जिल्ह्यामधील पिंपळगाव बसवंत (ता. निफाड) येथे मुखेड रोडवर उभारलेले **‘बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र’** अलिकडेच नागरिकांसाठी खुले झाले आहे. ‘कोविड’मुळे गेल्या काही महिन्यांपासून हे केंद्र बंद होते. परंतु आता विविध नव्या आकर्षणांसह ते कार्यान्वित करण्यात आले आहे. याची स्थापना बसवंत कृषी उद्योग पर्यटन उपक्रमांतर्गत करण्यात आलेली आहे.

नागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रात ‘कोविड’विषयक शासकीय नियमांचे काटेकोर पालन करण्यात येणार असून केंद्र संपूर्णपणे नव्या रूपात सुरू झाले आहे. प्रेक्षणीय आणि निसर्गरम्य अशा या उद्यानात प्रदर्शित करण्यात आलेल्या सचित्र फलकांद्वारे मिळणारी मधमाश्यांविषयीची शास्त्रीय माहिती अतिशय उपयुक्त आहे. परागीभवनाद्वारे पिकांच्या उत्पादनवाढीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या मधमाशीचे महत्त्व या उद्यानात चित्रमय रीतीने सांगण्यात आले आहे. त्या अनुषंगाने मधासह मिळणाऱ्या इतर मूल्यवान पदार्थांची सोप्या भाषेत दिली जाणारी माहिती सर्वांसाठीच उपयोगी ठरेल.

स्वयंपूर्ण अशा आदर्श ग्रामव्यवस्थेचे मॉडेल ठरणारे सेवरगांव, परागीभवनासाठी हंगामानुरूप तसेच पिकांनुसार शेतात ठेवावयाच्या मधमाशी पेट्यांचा नियोजन आराखडा, पेंटिंग गॅलरी, मधमाश्यांचे अपार महत्त्व सांगणारा माहितिपट, लहान मुलांसाठी प्ले एरिया, आग्या मधमाश्यांचे संरक्षण आणि एकूणच मधमाश्यांच्या संवर्धनाचे महत्त्व सांगणारी शिल्पे, बांबू व हस्तकला वस्तूंचे संग्रहालय (म्युझियम) तसेच विविध लज्जतदार खाद्यपदार्थ उपलब्ध असणारे ‘मधुबन फूड कोर्ट’ आणि ‘बसवंत कॅफे’ यांसह अनेक आकर्षणांचा येथे समावेश आहे. महाराष्ट्रात मधमाश्यांसाठी पोषक व पूरक असा मुबलक फुलोरा उपलब्ध असूनही मधमाशी पालन व मधनिर्मितीत महाराष्ट्र हा उत्तर भारतीय राज्यांच्या तुलनेत पिछाडीवर आहे. या पार्श्वभूमीवर येथील मधमाशी उद्यानातून मधमाशी पालनाचे प्रशिक्षण दिले जाऊन महाराष्ट्रात ‘मधुक्रांती’ घडून यावी, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

मधमाशी पालनामुळे परागीभवनातून शेती उत्पादनात वाढ तर होतेच शिवाय मधनिर्मितीमुळे एक शेतीपूरक जोडधंदा देखील निर्माण होतो. त्याखेरीज मधमाशीपासून मिळणाऱ्या मधाप्रमाणेच पोलन, रॉयल जेली, बी व्हेनम, मेण या मौल्यवान घटकांमुळे बेरोजगार तरुणांना या व्यवसायातून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. या अर्थलाभाचा विचार करूनच महाराष्ट्रातील प्रगतिशील शेतकरी इतरांना मधमाशी पालनाचा सल्ला देतात. या केंद्रात मधमाशी पालनाचे शास्त्रीय प्रशिक्षण देण्यात येते तसेच व्यवसाय उभारणीसाठी तज्ञांचे मार्गदर्शन व सल्लाही वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येतो. बसवंत कृषी उद्योग पर्यटनांतर्गत मधप्रक्रिया प्रकल्प, द्राक्षे, टोमॅटो, पेरू अशा विविध फळांवरील प्रक्रिया उद्योग प्रत्यक्ष बघता येणार आहेत. तसेच मधाची गुणवत्ता कशी तपासतात हे उद्यानास भेट देणाऱ्या पर्यटकांना जाणून घेता येईल. महाराष्ट्रातील होतकरू तरुण, शेतकरी यांना कृषी-प्रक्रिया उद्योगाकडे आकर्षित करून रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करून द्याव्यात, असा या केंद्राचा उद्देश आहे. एकंदरीतच ‘कृषी पर्यटन’ व्यवसायाला देखील एका वेगळ्या उंचीवर नेणारा हा आदर्श असा बसवंत कृषी-उद्योग पर्यटन प्रकल्प ‘मनोरंजनातून उद्योजकतेकडे’ हे ब्रीदवाक्य सार्थ ठरवीत आहे. खासगी आस्थापनेच्या स्वायत्त प्रयत्नांमधून उभे राहिलेले बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र हे केवळ राज्यातच नव्हे तर देशात अव्वल ठरेल असे वैशिष्ट्यपूर्ण केंद्र आहे. मधमाशी पालनाचे प्रात्यक्षिकांसह अभ्यासपूर्ण प्रशिक्षण देण्याची सुविधा येथे उपलब्ध आहे. या उपक्रमाची उचित दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयाने या संकल्पनेचे प्रणेते तसेच ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.’चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांना यावर्षी जागतिक पर्यटन दिनानिमित्त ‘पर्यटनमित्र’ पुरस्कार देऊन गौरविले आहे. या कृषी उद्योगात पर्यटकांना सशुल्क प्रवेश असून नाश्ता, जेवण आदींसाठी विविध पॅकेजेसही उपलब्ध आहेत. पर्यटक प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी www.Baswant.com वर करू शकतात. ■